आ. डॉ. नीलम गोऱ्हे
संस्थापक, विश्वस्त व अध्यक्ष



# ई. लेख :-:- आ.डॉ.नीलम गोऱ्हे

( पूर्व प्रसिद्ध- दै.लोकसत्ता: पुरवणी चतुरंग)

ई.१ स्त्रियांच्या मुक्तीचे समरांगण..

ई.२ भिंतीमागचा आक्रोश, जगाच्या उंबरठ्यावर..

ई.३ धोरणातून पथदर्शी उपायांच्या शोधात..

ई.४ सामर्थ्य आहे 'बदल घडविण्याचे'...

संकलन :- स्त्री आधार केंद्र, पुणे.
घर नंबर १४५ /१, सर्व्हे नंबर १४, गणेशनगर, समर्थ विहार सोसायटीसमोर, वडगाव धायरी, पुणे ४११०४१ दूरध्वनी : ०२०-२४३९४१०४, २४३९४१०३ email : streeaadharkendra@gmail.com, Site : www.streeaadharkenra.org

# स्त्रियांच्या मुक्तीचे समरांगण

१९९६ पासून क्रांतिकारी महिला संघटनेत सक्रिय सहभाग.
डॉ. नीलम गोऱ्हे | Updated: May 6, 2017




शिवसेना उपनेत्या व प्रतोद (वि.प.) आणि स्त्री आधार केंद्राच्या अध्यक्ष असणाऱ्या आमदार डॉ. नीलम गोऱ्हे या १९८४ पासून म्हणजे गेली ३३ वर्षे सामाजिक कार्यात सक्रिय सहभागी आहेत. महिला सक्षमीकरणासाठी अनेक आंदोलनांत, कार्यात सहभागी झालेल्या नीलम गोऱ्हे यांनी स्त्री चळवळीच्या स्थित्यंतराचा मोठा काळ पाहिला आहे. या काळातील त्यांचा प्रवास आणि स्त्रियांचा बदलाचा प्रवास त्यांच्या नजरेतून कसा कसा होत गेला हे सांगणारे सलग चार लेख दर शनिवारी.

संकलन :- स्त्री आधार केंद्र, पुणे.

आ. डॉ. नीलम गोऱ्हे
संस्थापक, विश्वस्त व अध्यक्ष



आमदार डॉ. नीलम गोऱ्हे यांनी १९७७ मध्ये मुंबई विद्यापीठाची आयुर्वेदातील पदवी घेतली. १९८४ पासून स्त्री आधार केंद्राच्या माध्यमातून महिला सबलीकरण कामात महाराष्ट्रभर कार्यरत.

१९९२ मध्ये आशियन लोकविकास केंद्र, बँकॉकमधून प्रशिक्षणाची तंत्रे व तज्ज्ञ विषयावरील पदविका घेऊन महिला व समुदाय विकास कार्यामध्ये संपूर्ण योगदान.

१९९६ पासून क्रांतिकारी महिला संघटनेत सक्रिय सहभाग. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरील प्रामुख्याने युनोच्या दक्षिण आशिया आणि इतर खंडांतील विविध संलग्न संस्थांशी संलग्नता व सातत्याने कार्य सुरू.

संपूर्ण महाराष्ट्रभरात महिलांवर होत असलेल्या अत्याचार आणि अन्यायाविरुद्ध आवाज उठवण्याचे व पीडितांना न्याय मिळवून देण्याचे काम अव्याहतपणे सुरू. महाराष्ट्र महिला राज्य आयोग आणि इतर विविध शासकीय समित्यांमध्ये, त्याचप्रमाणे मानवी हक्क क्षेत्रात मोठ्या प्रमाणात कार्यरत.

विविध दैनिकं, मासिकं, पाक्षिकं, दिवाळी अंकांमध्ये स्त्रीविषयक विषयांवर विपुल लेखन त्याचप्रमाणे अनेक पुस्तकांचे लेखन.

समाजिक कार्यासाठी, लिखाणासाठी, वक्तृत्वासाठी अनेक पुरस्कार.

जगात सर्वत्र नवविचाराच्या चळवळींनी १९७० चे दशक उफाळून उठले होते. विद्यार्थी – युवक राजकारणात सक्रिय होत होते. महाराष्ट्रातदेखील रोजगार हमी योजना, विद्यार्थी क्षेत्रातील देणग्यांवर आधारित प्रवेश, जातीयता, बेरोजगारी, भ्रष्टाचार, आदिवासी भूमिहिनांचे लढे यामुळे युवकांचे विश्व ढवळून निघाले होते. मी १९७३ ला पोतदार मेडिकल कॉलेजात शिकत असताना आयुर्वेदिक विद्यार्थ्यांच्या संघटनेत काम करायला लागले व विद्यार्थी चळवळींशी परिचय व्हायला लागला. मी १९७४ ला पुण्याच्या रानडे वक्तृत्व स्पर्धेत भाग घेतला व तेथेच माझा युवक क्रांती दलाशी परिचय झाला.

८ मार्च १९७५ ला जागतिक महिला दिनाच्या दिवशी वरळीच्या बीडीडी चाळीत महिला मेळाव्यात मी थोड्या वेळासाठी गेले होते. तिथे माझी ओळख लीला अल्वारीस, लीला गुजराती व कामगारांच्या प्रश्नांवर काम करणाऱ्या कार्यकर्त्यांशी झाली. मला त्याच कार्यक्रमात माहिती कळली की, नंदुरबार येथे एक भगिनी विधवा झाली आहे. काही वर्षांपूर्वी 'स्वेच्छेने' एक विधवा भगिनीने केशवपन केले होते, त्याच पावलावर पाऊल टाकत नंदुरबार येथेही तसेच घडणार होते. मी अस्वस्थ झाले. मी त्याच दिवशी 'युक्रांद'च्या बैठकीत ही सदर घटना सहकारी कार्यकर्ते व ज्येष्ठ सभासदांच्या कानावर घातली. आमच्यात थोडी चर्चा, विचारविनिमय झाला. मला वाटत होते की, अशा

स्त्रीविषयक अन्यायाच्या घटना घडल्यावर काही कृती होण्यापेक्षा माहिती आधीच कळली आहे, तर आपण तो प्रकार थांबवायचा प्रयत्न करावा. 'युक्रांद'च्या टीमने यात हस्तक्षेप करायचा ठरवलं. एक पथक लगेच तत्कालीन गृहराज्यमंत्री सुशीलकुमार शिंदे यांना भेटले व एक पथक नंदुरबारला रवाना झाले. गृह राज्यमंत्र्यांनी पोलीस अधीक्षकांना कसून सूचना दिल्या की, "असा काही प्रकार होतोय का ते तपासा आणि विशेषत: गेल्या काही दिवसांत जे मृत्यू झाले असतील त्याबाबत माहिती काढा." तर नंदुरबारला गेलेल्या पथकाला माहिती काढताना फारसे काही हाती लागेना. शेवटी त्यातील कार्यकर्त्यांने विधवेचे केशवपन करणाऱ्या लोकांचा शोध घेतला व एखाद्याला कोणा विधवेच्या केशवपनाचे काम सोपवले आहे का याची खबरबात घ्यायला सुरुवात केली. एका व्यावसायिकाने कबूल केले की, त्यांना दुसऱ्याच दिवशी एका घरात मागच्या दाराने जाऊन एका विधवेचे डोके भादरण्यास शंभर रुपयांची बेगमी करण्यात आली होती. मग त्याला समजावले गेले व त्याला शंभर रुपये देण्यात आले. थोडक्यात प्रत्यक्ष केशवपन होणार होते, परंतु ते थांबवले गेले. या प्रसंगातून माझ्या मनाला प्रत्यक्ष कृतीचे महत्त्व अधोरेखित झालेच व त्याचसोबत स्त्रियांवरील अत्याचार, सामाजिक अन्याय, जातीयता याबाबत जागृतीचा तिसरा डोळा प्राप्त झाला.

मी हा मेडिकलचा अभ्यास सांभाळत असताना 'युक्रांद'च्या कामाबरोबरच मुंबई विद्यापीठातील अनेक महाविद्यालयांचा एकत्रित आदिवासी विकास प्रकल्प डॉ. मुरलीधर गोडे व काही प्राध्यापकांनी हाती घेतला होता, त्यातही मी सहभागी झाले होते. सातत्याने ३ वर्षे या प्रकल्पांमध्ये पोदार आयुर्वेदिक महाविद्यालयातून आम्ही डॉक्टर्स व विद्यार्थी पालघरजवळच्या गावात जात होतो. मी या

८० डॉक्टर्सच्या टीमची प्रमुख (ग्रुप लीडर) म्हणून काम करत होते. आंध्र प्रदेशामध्ये वादळ आले तेथेही त्या तुकडीची मी कॅप्टन म्हणून अवनीगड्डा येथे गेले. आम्ही जवळजवळ महिनाभर राहून तेथे रुग्णसेवेचे काम केले. या काळात १९७६ च्या दरम्यान आणीबाणी लागू करण्यात आली होती. त्या काळात जयप्रकाश नारायण यांचे नवनिर्माणचे आंदोलन भारतभर उभे राहिले होते. हुंडाबंदी, वृक्षतोडबंदी, भ्रष्टाचारमुक्ती, लोकशाही या विचारांवर हे आंदोलन भारतभर पसरले व त्यात एक व्यापक आघाडी तयार होत गेली.

याचा दरम्यान मी प्रेमविवाह केला. पोदार आयुर्वेदिक महाविद्यालयात शेवटच्या परीक्षा, घरी कार्यकर्त्यांची वर्दळ, दुसरीकडे पूर्णवेळ कार्यकर्त्यांसाठी निधी उभारणे, त्यातच 'युक्रांद'च्या नगर जिल्ह्यातील कामासाठी येणाऱ्या कार्यकर्त्यांमुळे आमचे घर म्हणजे एक चळवळीचे केंद्र झाले होते. आरोग्यविषयक कामाला मी सामाजिक


घर नंबर १४५ /१, सर्व्हे नंबर १४, गणेशनगर, समर्थ विहार सोसायटीसमोर, वडगाव धायरी, पुणे ४११०४१ दूरध्वनी : ०२०-२४३९४१०४, २४३९४१०३ email : streeaadharkendra@gmail.com, Site : www.streeaadharkenra.org

दृष्टिकोनातून समजून घेऊ लागले. वैद्यकीय व्यवसायाबरोबर सामाजिक काम करण्याची मला निकड वाटू लागली म्हणूनच मी वैद्यकीय व्यवसायात बस्तान बसविताना सामाजिक आंदोलने व महिला संघटनांचा पायादेखील उभा करीत गेले.

आम्ही नंतर मराठवाड्यात १९७८ ला उदगीरला गेलो तेव्हा तेथील सरंजामी वातावरण, गरिबी, अनारोग्याचे प्रश्न, दुष्काळी परिस्थिती, यातून मला स्त्रियांच्या प्रश्नांवर काम करण्याची निकड जाणवत गेली. मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव देण्याचे आंदोलनही पेटले होते. उदगीरमध्येही मी महिला कामगार, महिलांवरील बलात्कार व हिंसाचारविरोधी संघटन केले. मी हे काम करताना राष्ट्रीय महिला आंदोलनाचा संदर्भ महत्त्वपूर्ण वाटत होता. विशेष म्हणजे १९७२ मध्ये वडसा देसाई गंज पोलीस स्टेशनमध्ये १९७२ मध्ये मथुरा या आदिवासी स्त्रीवर पोलिसांनी केलेल्या बलात्काराच्या प्रकरणाबाबत मथुरेच्या चारित्र्यावर ताशेरे देणारा निकाल १९७९ ला दिला गेला. भारतभर संघटनांनी त्याविरोधात पिटीशन दाखल केले होते. जागतिक महिला दशकाच्या जागृतीचे हे प्रत्यंतर रस्त्यावर व न्यायालयात दिसून आले. बदलांच्या या लाटा सामाजिक संघटनांच्या अंतर्गत स्त्री-पुरुष समानतेबाबत धडका मारत होत्या.

राजकीय व सामाजिक संघटनांतदेखील स्त्रियाचे स्थान दुय्यम राहते हा अनुभव पाश्चात्त्य देशांतील स्त्रीवादी अधोरेखित करीत होत्या. भारतीय वास्तवावर प्रकाश टाकणारा सरकारी अहवाल 'स्त्रियांचा दर्जा' १९७५ या वर्षी प्रसिद्ध करण्यात आला होता. अनेक कायदेविषयक बदल, हिंसाचाराबाबतची आकडेवारी, कामगार स्त्रियांबाबतची आव्हाने व शिक्षण, आरोग्य याबाबतीत व स्त्रियांचे दुय्यम स्थान यावर चांगलेच झणझणीत अंजन टाकले गेले होते. अशा परिस्थितीत केवळ काठावरून सूचना देणे मला निर्थक वाटायला लागले होते. आपल्या प्रश्नांची दखल राजकारण व समाजात घेऊन बदल आवश्यक वाटत होते. त्यासाठी प्रत्यक्षात सामाजिक व राजकीय जागृती गरजेची वाटत होती. स्त्रियांचे समाजातील, कुटुंबातील दुय्यम स्थान हे फक्त वैयक्तिक परिस्थितीचा परिणाम नाही, तर स्त्रियांचे प्रश्न हे सार्वजनिक जीवनाशी संबंधित आहेत याचे भान स्पष्ट होत गेले. 'पर्सनल इज पॉलिटिकल' ही वस्तुस्थिती बहुतेक सर्व स्त्रियाविरोधी होणाऱ्या हिंसाचारांत सत्य ठरते हे मी अनुभवत होते. आरोग्य व हिंसाचार यांचे जवळचे नाते, मुलगा-मुलगी यातील दुजाभाव, मुले नसल्यास फक्त स्त्रीची जबाबदारी मानून तिच्या छळाच्या घटना सातत्याने समोर येत होत्या.


**घर नंबर १४५ /१, सर्व्हे नंबर १४, गणेशनगर, समर्थ विहार सोसायटीसमोर, वडगाव धायरी, पुणे ४११०४१ दूरध्वनी : ०२०-२४३९४१०४, २४३९४१०३ email : streeaadharkendra@gmail.com, Site : www.streeaadharkenra.org**

एक डॉक्टर यासोबतच सामाजिक काम करणे हा माझा जीवनमार्ग घडत गेला. १९८१ या वर्षी हुंडाविरोधी कायद्यात सुधारणा करण्यासाठी देशव्यापी चळवळ उभी राहिली, तर १९८३ एव्हिडन्स ॲक्ट कायद्यात सुधारणा करण्यात आली. ३०४ (ब) व ४९८ (अ) यांसारख्या कायद्यांना प्रत्यक्षात आणले गेले त्या विचारांची बीजे याच काळात पेरली गेली. सर्वोच्च न्यायालयांनी स्त्रियांचा आवाज व अपेक्षा ऐकून घेऊन बरेच बदल करण्याचे निर्णय दिले.

१९७५ या वर्षी स्त्रियांच्या मानवी अधिकारांची एक प्रकाशशलाका मनात रुजली होती. स्त्रीविषयक सहा वर्षांत त्यातून चित्र व मार्ग अधिकाधिक स्पष्ट होत गेले. अभ्यास, स्त्रियांशी संवाद, प्रबोधन, रचनात्मक काम, संघर्ष व संघटन उभे करायचे हे मनात पक्के झाले. १९८० मध्ये मी माझ्या मुलीच्या, मुक्ताच्या जन्मानंतर पुण्यामध्ये हडपसर येथे दवाखाना सुरू केला होता. दवाखाना चालवत असतानाच स्त्रियांविषयक कृती करायला सवंगडी सहकारी मिळाल्या. आम्ही १९८१ या वर्षी 'क्रांतिकारी महिला संघटना' स्थापन केली, नंतर १९८४ ला स्त्री आधार केंद्रातून 'निरंतर कृती' करण्याचा संकल्प केला व कामाच्या क्षितिजाला गवसणी घालायला सुरुवात केली. या सुमारास मी दलित चळवळीतदेखील सक्रिय झाले. स्त्रीमुक्तीचे समरांगण असे अनेक रंगांनी समृद्ध होत गेले.

**डॉ. नीलम गोऱ्हे**

**neeilamgorhe@gmail.com**

आ. डॉ. नीलम गोऱ्हे
संस्थापक, विश्वस्त व अध्यक्ष



# भिंतीमागचा आक्रोश, जगाच्या उंबरठ्यावर..

राजस्थानमध्ये ४ सप्टेंबर १९८७ ला रुपकुंवर सती जाण्याची घटना उघडकीस आली

डॉ. नीलम गोऱ्हे | Updated: May 13, 2017



स्थानिक स्वराज्य संस्थात स्त्रियांना आरक्षण देण्याबाबतही सरकारवर स्त्री संघटनांचा दबाव वाढायला लागला.

भारतात स्त्रीविरोधी जो हिंसाचार होत आहे त्याला व्यक्त करायला हवे व त्यासाठी सामाजिक प्रबोधनातून साद घालण्याची गरज वाटत होती. आम्ही कौटुंबिक छळाला, हुंडयाला विरोध करून प्रश्न विचारायला लागलो तेव्हा आम्हाला सुरुवातीला धुडकावून लावले जात असे. जुन्नर, बारामती, कामशेत, नगर, जळगाव,


घर नंबर १४५ /१, सर्व्हे नंबर १४, गणेशनगर, समर्थ विहार सोसायटीसमोर, वडगाव धायरी, पुणे ४११०४१ दूरध्वनी : ०२०-२४३९४१०४, २४३९४१०३ email : streeaadharkendra@gmail.com, Site : www.streeaadharkenra.org

**फलटण, नागपूर, वर्धा, जालना, रत्नागिरी, सातारा, सोलापूर, लातूर, उस्मानाबाद, औसा आदी ठिकाणच्या या परिषदांत गावोगाव स्त्रिया एवढे बोलत आहेत यांचेच अप्रूप होते.**

कायदे बदल व महिलाविषयक धोरणे बदलण्यासाठी आंदोलने व त्यासाठी शासनासोबत संवादाचा कालखंड म्हणून १९८५ ते १९९५ हा कालखंड पाहावा लागेल, भारतात १९८८ मध्ये 'राष्ट्रीय महिला धोरणविषयक मसुदा' तयार करण्यास सुरुवात झाली. १९८९ ला केंद्रात सत्तांतर झाल्यावर कायदे बदल-जागृती घडवणारी एखादी यंत्रणा सरकारमध्ये असावी व 'राष्ट्रीय महिला आयोग' तयार करावा असे वाटू लागले. त्यासाठी सर्व राष्ट्रीय पक्षांच्या महिला नेत्या व सामाजिक संघटना यांचे अनेक परिसंवाद- कृतिसत्रे देश पातळीवर घडू लागली. त्या वेळी स्वतंत्र महिला बाल विकास विभाग अस्तित्वात नव्हता, सामाजिक न्याय विभागाचाच उपविभाग म्हणून महिला बाल विकास विभाग काम करीत होता. त्या वेळी प्रमिलाताई दंडवते व रामविलास पासवान यांनी पुढाकार घेऊन भारतात या सर्व चेतनाचक्राला चालना दिली. स्थानिक स्वराज्य संस्थात स्त्रियांना आरक्षण देण्याबाबतही सरकारवर स्त्री संघटनांचा दबाव वाढायला लागला.

भारतात हे घडत असताना स्त्रीविरोधी जो हिंसाचार होत आहे त्याला व्यक्त करायला हवे व त्यासाठी सामाजिक प्रबोधनातून साद घालण्याची गरज वाटत होती. स्त्री आधार केंद्र व क्रांतिकारी महिला संघटनेने यासाठी पुणे जिल्ह्यात ४०० गाव पातळीवरच्या शाखा, मेळावे, परिषदा यांचे मोठे जाळे उभे केले. पण त्यासोबत काही व्यापक व्यासपीठेही उभारण्याची गरज वाटायला लागली. आम्ही कौटुंबिक छळाला, हुंड्याला विरोध करून जशा प्रश्न विचारायला लागलो तेव्हा आम्हाला सुरुवातीला धुडकावून लावले जात असे. 'पत्नीला घरात मारहाण केली तर तुम्ही आम्हाला विचारणारे कोण?' हा प्रश्न नेहमीचाच होता. पुरुषवर्गाचे प्रबोधन व्हावे म्हणून आम्ही १९८९ ते १९९१ या काळात महाराष्ट्रात २५ ठिकाणी 'सत्यशोधक महिला परिषदा' घेतल्या. या परिषदा महात्मा जोतिराव फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मृतिप्रीत्यर्थ घेतल्या होत्या. आम्ही परिषदांत एकतर्फी भाषणे न ठेवता पथनाट्ये, गीतेही तयार केली होती. पोस्टरचेही प्रदर्शन केले होते. दुपारी एकाच वेळी १५/२० गटचर्चा होत. त्यात 'नागरी सुविधा नसल्याने स्त्रियांचे होणारे हाल व त्यासाठी निर्णयप्रक्रियेत सहभाग', 'स्त्रियांचा जाहीरनामा', 'मुलगा-मुलगी एक समान', 'अंधश्रद्धा', 'जातीयता', 'जावा जावा उभा दावा', 'सासू-सुना-नाते' या विषयांवर स्त्रिया भरभरून बोलायच्या. जुन्नर, बारामती, कामशेत, नगर, जळगाव, फलटण, नागपूर, वर्धा, जालना, रत्नागिरी, सातारा, सोलापूर, लातूर, उस्मानाबाद, औसा आदी ठिकाणच्या या परिषदांत गावोगाव स्त्रिया एवढे बोलत आहेत यांचेच

संकलन :- स्त्री आधार केंद्र, पुणे.

अप्रूप होते. माध्यमे ही त्या काळात आमची दोस्त बनली. तरुण पत्रकार, मुले, मुली व सर्व चळवळींनी आम्हाला अंत:करणात स्थान दिले.

राजस्थानमध्ये ४ सप्टेंबर १९८७ ला रुपकुंवर सती जाण्याची घटना उघडकीस आली. सतीचे समर्थन अत्यंत जाहीरपणे अनेकांनी केले. त्यानिमित्ताने उत्तर प्रदेश, राजस्थान व विशेषत: हिंदी भाषिक राज्यांत सती परंपरेचे उदात्तीकरण करण्यात आले. एका बाजूला रुपकुंवरच्या सतीचे समर्थन तर दुसरीकडे शहाबानो केसच्या निमित्ताने मुस्लीम स्त्रियांच्या पोटगीचा व तिहेरी तलाक विषयांच्या निमित्ताने धर्माच्या आधारे स्त्रियांच्या शोषणाचे उदात्तीकरण करणारे घटक एकमेकांच्या समोर ठाकले. मुस्लीम स्त्रियांच्या पोटगीच्या विषयासोबतच महाराष्ट्रातील पोटगीविषयक केसेसची दुरवस्था समोर आली. १५०/२०० रुपये पोटगीसाठी ४/५ वर्षे लागत होती. सीआरपीसी १२५ नुसार पोटगी मिळण्याची मर्यादा ५०० रुपये होती. त्यातून एकटया स्त्रीला सामान्य जगात एक शब्द चिकटवलेला होता, परित्यक्ता अथवा टाकलेली स्त्री. महाराष्ट्रात परित्यक्ता स्त्रियांना पोटगीचा अधिकार असला तरी अनेक जातींत पुनर्विवाह निषिद्ध मानले गेले होते व आजही इतर विषयांत बदल झाले असले तरी याबाबत परिवर्तन झालेले नाही. ४०/५० हजार स्त्रियांच्या या मोर्चाला डॉ. बाबा आढाव, आम्ही महिला संघटना, यांनी चालना दिली. मृणाल गोरे, अहिल्या रांगणेकर, कॉ. तारा रेड्डी, प्रमिला दंडवते यांच्यासोबत मीही नेतृत्व केले. शरदराव पवारांनी पोटगीविषयक कायदे बदलण्यास एक समिती त्या वेळी नेमली. त्या समितीने अनेक शिफारशी केल्या. प्रत्यक्षात १९९७ ला युतीचे सरकार असताना त्या शिफारशीनुसार कायदा बदलला गेला. नंतर कौटुंबिक न्यायालये झाली, तरीही खूपसे प्रश्न बाकी आहेत. निष्प्रेम विवाहाचे ओझे स्त्रियांनी वाहत राहायचे, त्यासाठी वर्षांनुवर्षे नवऱ्याने नांदविण्यासाठी न्यायालयाच्या पायऱ्या झिजवायच्या हे आजही चालू आहे. कारण स्त्री एकटी जगू शकते याला मान्यता, प्रतिष्ठा नाही व समाजात समंजसपणाचा अभाव दिसतो.

या वाटचालीत काही महत्त्वपूर्ण वळणे वा मैलाचे दगड म्हणता येतील असे टप्पे आहेत. त्यातील ३० सप्टेंबर १९९३ ला लातुरात प्रलयकारी भूकंप झाला, यात दहा हजारच्या वर माणसे दगावली व औसा, उमरगा, लोहारा परिसरांतील घरे जमीनदोस्त झाली. शेती-उद्योगाचे प्रचंड नुकसान झाले. विधवांची मोठी संख्या होती. त्यांचा जमीनजुमला, शेती बळकावणाऱ्या प्रवृत्ती त्यांच्याभोवती घिरट्या घालत होत्या. स्त्री आधार केंद्राचे लातूरमध्ये अनेक कार्यक्रम झाले होते. त्यामुळे मला मराठवाडा, लातूर, उस्मानाबाद परिसर परिचित होते. मी व माझ्या सहकारी स्त्रियांनी महाराष्ट्रातील इतर स्वयंसेवी कार्यकर्त्यांप्रमाणे तेथे धाव घेतली. आम्ही सप्टेंबर १९९३ ते

२००० पर्यंत व नंतरही मदत, पुनर्वसन, शेती साहाय्य, समुपदेशन, स्त्रियांचे स्वमदत गट गावोगाव उभारत काम केले. नैसर्गिक आपत्तीत असणारे स्त्रियांच्या विशेष प्रश्नांचे रूप ठळकपणे समोर येत गेले तसतसे कामाचे रूप व्यापक होत गेले. आजही आम्ही तेथील विधवा भगिनी, दुष्काळग्रस्त यांच्यासोबत काम करतो आहोत. संयुक्त राष्ट्र संघाच्या महिला विभागाने या कामाची अनेक वेळा दखल घेतली. भूकंपानंतरच्या या कामात तेथील स्त्रियांनी तयार केलेले एक गीत फार हृदयस्पर्शी होते. 'बाई, पाय पोळत मंदिर गाठलं मला मंदिरात यावंसं वाटलं, बाई कष्टानं पातळ फाटलं मला महिलात यावंसं वाटलं.' हे गीत गाताना या एकट्या हजारो स्त्रियांचे डोळे आसवांनी भरून जात असत. मी माझेही अश्रू अशा वेळी दिसू दिले नाहीत तरी रात्री माझ्या डायरीत असे अनुभव उमटत होते.

१९९३ मधील महत्त्वाची घटना म्हणजे राज्यात महिला आयोगाची स्थापना झाली. पक्षीय चौकटीच्या मर्यादेतच त्याची रचना होत गेली, ती आम्हाला मान्य नव्हती. परंतु कामास खीळ नको म्हणून मी त्यावर सदस्यत्व स्वीकारले. त्यातही २/३ वर्षे मी, शारदा साठे, विजया पाटील आदी काम करीत होतो. विशेष म्हणजे महाराष्ट्र सरकारने राज्यात स्त्रीविषयक धोरणाची निर्मिती करायची ठरवली. त्याची प्रक्रिया १०/११ महिने चालली, पण त्यात राज्यातील स्त्री चळवळ ढवळून निघाली. मुलींना संपत्तीत अधिकार, घरावर, शेतीवर पती-पत्नीचे नाव, कायद्यात समानतेवर आधारित बदल ही या धोरणाची वैशिष्ट्ये होती. राज्यात एका बाजूला जळगाव वासनाकांडाप्रमाणे घटना समोर येत होत्या तर महिला धोरणही घडत होते. १९९४ ला स्त्रियांना शहरातील व ग्रामीण भागातील स्थानिक स्वराज्य संस्थेत ३३ टक्के आरक्षण देणारी ७३ व ७४ वी घटनादुरुस्ती झाली. अनेक वाद, प्रश्न यांचे मोहोळ उठले होते. या सर्व घटनांना वैश्विक परिमाण होते ते चौथ्या विश्व महिला संमेलनाचे होते. संयुक्त राष्ट्र संघ आयोजित या विश्व महिला संमेलनात शांतता, समानता, विकास व मैत्री या आधाराने स्त्रियांच्या शेकडो प्रश्नांचा एक गोफ 'पायथा ते माथा' विणला गेला. जगाच्या उंबरठ्यावर स्त्रिया निम्मे नव्हे तर सर्व आकाश पेलण्याची आकांक्षा ठेवू लागल्या होत्या. महिला दशकानंतरचे हे दशक राजकीय, सामाजिक, आर्थिक अशा अनेक बदलांमुळे ऐतिहासिक स्वरूपाचे ठरले.

**डॉ. नीलम गोऱ्हे neeilamgorhe@gmail.com**